## श्री रामकृष्ण नेत्रालय

सुपर स्पेशालिटी आय केअर

प्रस्तुत

# ज्येष्ठोत्सव



उपक्रम

ठाणेवैभव

## मिळवा
# चष्म्या पासून स्वातंत्र्य...

अत्याधुनिक
रोबोटीक व
ब्लेड विरहीत

## मोतिबिंदू व लेसिक सर्जरी

द्वारे.



**रोबोटीक व ब्लेड विरहीत मोतिबिंदू व लेसिक शस्त्रक्रिया**

**मोतिबिंदू | काचबिंदू | डायबेटीक रेटीनोपथी**

**डोळ्यांचा कोरडेपणा | कॉर्निया आणि रेटीना चिकित्सा**

**बाल नेत्र चिकित्सा | चाईल्ड मायोपिया क्लिनिक**

**अपॉईंटमेंटसाठी संपर्क : ७५०६०६६७६९**

- दोस्ती इंपेरीआ, पहिला मजला, मानपाडा, घोडबंदर रोड, ठाणे (प)
- श्री बालाजी अपार्टमेंट्स, पहिला मजला, मखमली तलावा जवळ, एलबीएस रोड, ठाणे (प)
- शहा ग्रूप बिल्डींग, सेक्टर १७, पहिला मजला, अभ्युदय बँक समोर, वाशी
- प्लॉट न. ४, सेक्टर ४६ए, मोर सुपर मार्केट समोर, सीवुड्स (प)
- रोमवेल वसंती, नवघर रोड, मुलुंड जिमखानाच्या जवळ, मुलुंड (पु)

**Shree Ramkrishna Netralaya**

SUPER SPECIALITY EYE CARE

www.shreeramkrishnanetralaya.com



# सेंच्युरी तो बनती है....!!!

संध्या छाया म्हटले तर नैराश्येचे मळभ पसरते एंड सेकंड इनिंग असे वर्णन झाले तर आशा आणि उत्साहाच्या विविध छतांनी जीवनाचा कॅनवास रंगून जातो . ठाणेवैभवने उत्साह, उमेद आणि या वयातही उत्स्फूर्तता टिकून रहावी याकरिता ज्येष्टोत्सवाचे आयोजन केले. त्याला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने आम्ही अचंबित झालो आहोत आणि जीवन यानाच कळले हो अशी भावना आमच्या मनात निर्माण झाली आहे.

व्यक्तीसापेक्ष विचार केल्यास वयाची साठी लौकिक अर्थाने ज्येष्ठ होऊन जातो . परंतु सरासरी जीवन रेषा हळूहळू सत्तरी पार करू लागल्याने साठीत तारुण्यसुलभ कृतिशीलता  वाढलेली दिसते . यामागे वैद्यकीय क्षेत्रातील विकास हे एक कारण असले तरी ज्येष्ठ नागरिकना मिळणारी संधी, त्यांच्यातील सकारात्मकता  वृद्धिंगत करणारे पोषक वातावरण आणि समाजाच्या बदलत्या दृष्टिकोनमुळे age is nothing but numbers असे म्हणण्याजोगी स्थिती आपण अनुभवत आहोत . आशा पार्श्वभूमीवर ठाणेवैभवने श्री रामकृष्ण नेत्राळ्याच्या सहकार्याने या उपक्रमाचा प्रपंच मांडला आहे .

समाजातील सर्व स्थरातील नागरिकांशी वर्तमानपत्र म्हणुन ठाणेवैभवाचा संबंध येत असतो. राजकारण, अर्थकारण, सांस्कृतिक आघाडी, महिला, तरुणाई, श्रमिक बांधव आदींचे प्रश्न आम्ही हिरिरीने मांडत असतो . साहजिकच गेल्या काही वर्षात ज्येष्ठ नागरिक संघटनांचे काम वाढू लागले आहे आणि त्याबाबत आमच्याकडे खूप मजकूर येत असतो.त्याला प्रसिद्धी देऊन त्याना प्रोत्साहित करण्याचे काम सुरूच असते .

मंगेश पाडगावकरांच्या त्या प्रसिद्ध अर्ध्या भरलेल्या पेल्याचे उदाहरण ज्येष्ठांबद्दल हा लेख संपवताना इष्ट ठरेल . प्याला अर्धा अजुन भरावयाचा आहे आणि जीवनही भरभरून जगवयाचे आहे हा आशावाद ज्येष्ठोत्सव जागा करील ही आशा आहे . शेवटी म्हणतात ना Age is a question of mind over matter. If you don't mind, it doesn’t matter.

सेकंड इनिंग खेळणाऱ्या सर्व बुजुर्ग मंडळींना शुभेच्छा देताना आम्ही एवढेच म्हणु..: सेंच्युरी तो बनती है.असेच हसत खेळत रहा!

# ज्येष्ठ संघांच्या हाती 'मध्यवर्ती'ची काठी

सिटी आफ लेक्स म्हणजे तळ्यांचे शहर असणारे ठाणे हे एक औद्योगिक शहर म्हणूनही ओळखले जाते. शहराला ओद्योगिकीकरणाची जुनी आणि संपन्न परंपरा आहे. या शहरात अनेक ओद्योगिक वसाहती आहेत. मोठ्या कंपन्यांपासून ते छोट्या गाळ्यांपर्यंत येथे हजारोंनी औद्योगिक युनिटस आहेत. या कारखान्यांमध्ये काम करणारे कामगार आणि ठाण्यात राहून मुंबईला रोजगारासाठी जाणारे कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय हे शहराच्या लोकसंख्येचा मुख्य भाग आहेत. त्याशिवाय या शहरात निवृत्तीनंतरचे कृतार्थ जीवन जगणाऱ्या वृध्दांची संख्याही लक्षणीय आहे. 30 वर्षांपूर्वी सरकारी नोकरीतून निवृत्त झालेल्या अनेकांनी निवृत्तीनंतरचे जीवन सुखाने जगण्यासाठी या निसर्गरम्य शहराची निवड केली होती. ठाणे तेव्हा आजच्यासारखे गजबजलेले नव्हते. त्याकाळी ही मंडळी पहाटे आणि संध्याकाळी ठाण्यातील प्रसिध्द मासुंदा तलाव परिसरात फेरफटका मारण्यासाठी नियमीतपणे येत असत. त्यांचे पाच अनौपचारिक संघ निर्माण झाले होते. हे संघ आपापले कार्यक्रम स्वतंत्रपणे आयोजित करीत असत. 1991 साली ज्येष्ठ कवी म. पां. भावे यांनी पुढाकार घेऊन मराठी ग्रंथ संग्रहालयात त्यांची बैठक घेतली आणि त्यांच्या कार्यात समन्वय घडवून आणण्यासाठी एक मध्यवर्ती समिती स्थापन केली. त्यानंतर या स्रर्व मंडळांची फक्त वार्षिक संमेलने एकत्र होऊ लागली. 1992 ला पहिले एकत्रित संमेलन सिनिअर सिटीझन्स क्लबने, 93 ला विरंगुळा संघाने, 94 ला सावलीने, 95 ला कळवा संघाने अशी काही एकत्रित संमेलने झाली. मात्र विविध संघांच्या कार्यात काही समन्वय नव्हता. 2000 साली मधुकर देऊसकर यांनी अधिकृत मध्यवर्ती समिती स्थापन करण्याचा विचार मांडला. त्यानुसार अशी समिती स्थापन झाली. सावली ज्येष्ट नागरिक संघाचे साईप्रसाद पाटणकर यांना तिचे अध्यक्ष बनवले गेले. 2007 साली या संस्थेची अधिकृतरित्या नोदणी झाली. तेव्हा विष्णू गोरे हे तिचे अध्यक्ष, जवाहर भट उपाध्यक्ष तर भालचंद्र प्रधान कार्यवाह होते. आता ठाणे शहर व परिसरात ज्येष्ठ नागरिकांचे एकूण 32 कार्यरत आहेत. ज्येष्ठ नागरिक संघ मध्यवर्ती समिती या सर्व संलग्न संघांच्या कार्याचे समन्वयन करते. एरवी प्रत्येक संघ आपापले कार्यक्रम वेगवेगळे आयोजित करतो पण मध्यवर्ती समितीद्वारे दिशानिर्देश देऊन त्यांच्यात सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक संलग्न संघाचे दोन कार्यकारिणी सदस्य मध्यवर्ती समितीत असतात. सध्या प्रकाश दिघे हे मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष तर रवींद्र दळवी सरचिटणीस आहेत. ठाणे महापालिकेने मध्यवर्ती समितीला वारकरी भवन, ठाणे पश्चिम येथे सभागृह व कार्यालयासाठी जागा दिली आहे. तिथून मध्यवर्ती समिती ठाणे परिसरातील सर्व संलग्न ज्येष्ठ नागरिक संघांच्या कामाचे समन्वयाचे कार्य करते. दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी मध्यवर्ती समितीच्या कार्यकारिणीची व चौथ्या सोमवारी संलग्न संघांच्या अध्यक्ष-कार्यवाहांची बैठक होते. त्यात पुढे कोणते कार्यक्रम करायचे यावर चर्चा होते. नवीन कल्पनांचे स्वागत केले जाते. संस्थेतर्फे दरवर्षी मानकरी हा वार्षिक अंक ऑक्टोबरमधे काढला जातो. मध्यवर्ती समितीतर्फे अड. प्रमोद ढोकळे हे चौथ्या सोमवारी ज्येष्ठ नागरिकांना मोफत कायदेविषयक सल्ला देतात. समितीतर्फे योगाभ्यास प्रशिक्षण, आरोग्य तपासणी शिबिरे, फिजिओथेरपी केंद्र व एकूणच आरोग्यविषयक अनेक उपक्रम राबवले जातात. विरंगुळा केंद्र चालवले जाते. सदस्यांच्या कलागुणांना वाव देणारे कार्यक्रम फॅन्सी ड्रेस स्पर्धा, कराओके गाण्यांचे आयोजनही केले जाते. लवकरच श्रावण मास मंगळागौर कार्यक्रम तसेच सैन्यदलातील परम विशिष्ट सेवा पदक विजेते श्री. उतेकर यांच्याशी सुसंवादाचा एक कार्यक्रम होणार आहे. ज्येष्ठ नागरिक मध्यवर्ती समितीतर्फे दैनिक वृत्तपत्रांचे एक वृत्त वाचनालयही चालवले जाते. दरवर्षी सर्व संलग्न संघांच्या सदस्यांची एक वर्षासहल काढली जाते. लवकरच रुग्णोपयोगी साहित्य पुरवठा सेवाही सुरू होणार आहे. पोलीस विभागाला एकटे राहणाऱ्या वृध्द सभासदांची यादी पुरवून त्यांच्या सुरक्षेची काळजी घेतली जाते. फेसकॉम ही महाराष्ट्रातील सर्व ज्येष्ठ नागरिक संघांची केंद्रीय शिखर संस्था आहे. तिचे डोंबिवलीत मुख्य कार्यालय आहे. ती सरकारी पातळीवरून ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी कार्यरत असते. ठाणे ज्येष्ठ नागरिक संघ मध्यवर्ती समिती तिच्याशी संलग्न आहे. एकूण ज्येष्ठ नागरिकांमध्ये सुसंवाद , एकत्रीकरण घडवून त्यांच्या आयुष्याच्या संध्याकाळी त्यांच्या जीवनात विविध रंग भरण्याचे कार्य ठाणे शहर ज्येष्ठ नागरिक संघ मध्यवर्ती समिती करीत आहे.

## ज्येष्ठ नागरिक संघ मध्यवर्ती समिती, ठाणे



**अध्यक्ष - प्रकाश दिघे**
**– 98204 61476**



श्री रामकृष्ण नेत्रालय
Super Speciality Eye Care




# वृद्धत्व संकल्पना मोडीत

## सिनियर सिटिझन्स क्लब ठाणे नॉर्थ

ज्येष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांचे नुकतेच निधन झाले. ते सिनिअर सिटीझन्स क्लब , ठाणे ( नॉर्थ ) चे सभासद होते. या क्लबची स्थापना 27 जुलै 1987 रोजी श्री. व सौ. रसाळ यांनी केली. या क्लबच्या कार्यक्षेत्रात प्रामुख्याने ब्राह्मण सोसायटी, पाचपाखाडी हा भाग येतो. 2009 पासून सुरेश गुप्ते हे अध्यक्ष तर शीला पाटील या उपाध्यक्षा आहेत. सध्या या संघाचे 590 सभासद आहेत. ‘ तरूण राहा , तरूण व्हा ‘ – हे या क्लबचे स्लोगन आहे. या ब्रीदवाक्याला अनुसरून सभासदांसाठी नेहमी मन प्रसन्न करणारे मनोरंजनात्मक मूल्य असलेले कार्यक्रमच आयोजित केले जातात. वृध्दत्वाची जाणीव करून देणारे ( भजन वगैरे ) कार्यक्रम टाळले जातात. दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या गुरूवारी उमा निळकंठ व्यायामशाळा येथे संस्थेचे सभासद एकत्र येतात. या बैठकांमध्ये सभासदांच्या मनोरंजनासाठी गाणी, गोष्टी, कवितांचे कार्यक्रम सादर केले जातात. नामवंत वक्त्यांची व्याख्याने आयोजित केली जातात. तसेच आजवर, दा. कृ. सोमण, साधना जोशी, मेघना साने यांचा मेघमणी असे कार्यक्रम आणि अनेक नामवंत वक्त्यांची व्याख्याने झालेली आहेत. क्लबतर्फे सर्व सभासदांचे वाढदिवस साजरे केले जातात. वयाची ऐंशी व विवाहाला 50 वर्षे पूर्ण करणाऱ्या सदस्यांचा विशेष सत्कार केला जातो. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे सिनिअर सिटीझन्स क्लबतर्फे ‘ सामाजिक बांधिलकी निधी ’ नावाचा एक अफलातून उपक्रम राबवला जातो. यात क्लबचे सदस्य दरमहा त्यांच्या घरातील वृत्तपत्रांच्या रद्दीविक्रीतून आलेल्या रकमेपैकी 10 रु. सामाजिक बाधिलकी निधीला दान देतात. असे प्रत्येक सभासद वर्षाला 120 रु. देतो. यातून एक लक्षणीय रक्कम उभी राहते. तिचा विनियोग दिव्यांग विद्यार्थ्यांच्या





चित्रकला व इतर स्पर्धा आयोजित करण्यासाठी, पारितोषिके देण्यासाठी केला जातो. अनेक सदस्य त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने कल्बला देणगी देतात. त्या रकमतून क्लबने कायम ठेवी बनवल्या आहेत. त्या ठेवींवरील व्याजातून सिनिअर सिटीझन्स क्लब अनेक कार्यक्रम आयोजित करतो. क्लबतर्फे दरवर्षी एक दिवसभराची वर्षासहल आयोजित केली जाते. त्यासाठी ठाणे शहराच्या आसपासची ठिकाणेच निवडली जातात. सर्व सदस्य वृध्द असल्याने संध्याकाळी लवकर परत येण्याकडे कटाक्ष असतो. क्लबच्या आरोग्य शिबिरांना ठाण्यातील डॉक्टर्स चांगले सहकार्य करतात. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांसाठी कार्य करणाऱ्या नाना पाटेकर यांच्या नाम फाउंडेशनला सिनिअर सिटीझन्स क्लबने 1,67,000/- देणगी दिली होती. तसेच 2020 साली कोकणात पूर आला तेव्हा मुख्यमंत्री निधीला 50,000/- रु. देणगी दिली होती. जागर फाउंडेशन आणि भाजपा ठाणे शाखेने या क्लबचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव केला होता. ज्येष्ठ नागरिक विश्वातील अतिशय बहुमानाचा पुरस्कार इंटरनॅशनल लॉन्जिटिविटी सेंटर तर्फे दिला जातो. 2015 साली हा देशातील सर्वोत्कृष्ट ज्येष्ठ नागरिक संघाचा पुरस्कार सिनिअर सिटीझन्स क्लब, ठाणे ( नॉर्थ ) ला मिळाला होता.



**अध्यक्ष – सुरेश गुप्ते – 9870241950**

# 'सन्मित्र'ने फुलवले निवृत्तीनंतरचे जीवन

## सन्मित्र सिनिअर सिटीझन्स असोसिएशन

नौपाडा विभागातील रेल्वे, सचिवालय आणि बँक या विभागांतून निवृत्त झालेल्या काही ज्येष्ठांनी 10 फेब्रुवारी 1985 ला एक ज्येष्ठ नागरिक संघ स्थापन केला. तो म्हणजे आत्ताचा सन्मित्र सिनिअर सिटीझन्स असोसिएशन. बोलीभाषेत या असोसिएशनला सन्मित्र ज्येष्ठ नागरिक संघ असे म्हटले जाते. बळवंतराव कर्वे व पोंक्षे यांनी या संघाची स्थापना केली. यंदा या संघाचे 38 वे वर्ष चालू आहे. 2019 पासून सुरेश आपटे हे 83 वर्षांचे ज्येष्ठ या संघाचे अध्यक्ष आहेत. सध्या या संघाचे 985 सभासद आहेत. त्यात निवृत्त बँक कर्मचारी महिला सदस्यांची संख्याही लक्षणीय आहे. संघातर्फे दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी सर्व सभासद एकत्र जमतात. तेव्हा साहित्य, काव्य, आरोग्यविषयक आणि करमणुकीचे विनोदी कार्यक्रम आयोजित केले जातात. पार्ले, पुणे, डोंबिवली येथून काही नामवंत वक्त्यांना बोलावून त्यांची व्याख्याने ठेवली जातात. आजवर अशोक चिटणीस, दा. कृ. सोमण, धनश्री लेले, शिल्पा गोखले, मधुरा महंत, स्मीता पटवर्धन, आदी मान्यवरांनी या संघात व्याख्याने दिली आहेत. अलीकडेच अलका वढावकर यांचा नांदा सौख्यभरे व वृंदा गोडसुलकर यांचा पहावा विठ्ठल हे कार्यक्रम झाले. या संघाचे सर्व जाहीर कार्यक्रम मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या ग. ल. जोशी सभागृहात होतात. तर कार्यकारिणीच्या बैठका नौपाड्यातील ब्राह्मण सेवा संघाच्या कार्यालयात होतात.



दोन्ही ठिकाणी संस्थेला सवलतीच्या दरात जागा उपलब्ध करून दिली जाते. संघातर्फे आरोग्य तपासणी शिबिरेही घेतली जातात. तसेच पावसाळ्यात एक दिवसीय वर्षा सहलीचे आयोजन केले जाते. पाक्षिक कार्यक्रमांत आपल्या सभासदांच्या कलागुणांना वाव देण्यावर भर दिला जातो. सभासदांना काव्य, लेख, गाणी सादर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. बाहेरचे वक्ते बोलावण्यापेक्षा आपल्याच



सदस्यांना व्यासपीठ मिळवून देण्याचे संघाचे धोरण आहे. सदस्यांच्या नातवंडांचा उत्तम शैक्षणिक कामगिरीबद्दल गौरव केला जातो. दर महिन्याच्या चौथ्या शनिवारी त्या महिन्यात ज्यांचे वाढदिवस असतात त्यांचा सत्कार केला जातो. संस्थेचे दरवर्षी वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केले जाते. जुन्या काळात रेल्वेने प्रवास केलेल्या अनेक सभासदांना (त्या काळी मनोरंजनाची फारशी साधने नसल्याने ) पत्ते खेळण्याची मोठी आवड आहे. त्यांच्या आग्रहानुसार वार्षिक स्नेहसंमेलनात रम्मी, ब्रिज, मेंढीकोट इत्यादी पत्त्यांच्या खेळांच्या स्पर्धा घेतल्या जातात.

**अध्यक्ष – सुरेश आपटे – 93222 76476**

ठाणेवैभव

श्री रामकृष्ण नेत्रालय
Super Speciality Eye Care

ज्येष्ठोत्सव




Treat the root cause of Dry Eyes with

LIPIFLOW®
THERMAL PULSATION

www.shreeramkrishnanetralaya.com | Call: 82917 14838/ 75060 66769

OUR BRANCHES: GHODBUNDER ROAD | VASHI
MAKHAMALI TALAO | MULUND | SEAWOODS

Shree Ramkrishna Netralaya
Super Speciality Eye Care

श्री रामकृष्ण नेत्रालय
Super Speciality Eye Care



# ज्येष्ठ तरुणांनी वसवले सामाजिक कार्यातून 'श्रीनगर'

## श्रीनगर ज्येष्ठ नागरिक संघ



ज्येष्ठ नागरिक संघ म्हटले वेळ घालवण्यासाठी एकत्र येणाऱ्या कार्यनिवृत्त वृध्दांचे चित्र डोळ्यासमोर येते. पण उतारवयातही ज्येष्ठ नागरिक समाजसेवेच्या क्षेत्रात लक्षणीय काम करू शकतात. विधायक कार्य करू शकतात. समाजाच्या, आपल्या विभागाच्या, वस्तीच्या नागरी समस्या निवारण करण्यात मोलाचा वाटा उचलू शकतात. याचे एक आदर्श उदाहरण म्हणजे श्रीनगर ज्येष्ठ नागरिक संघ !! ठाणे शहराच्या मुलुंडकडील भागात हा संघ कार्यरत आहे. याची स्थापना 2000 साली जवाहर भट यांनी केली. ते सेवानिवृत्त रेल्वे अधिकारी होते. या संघाच्या क्रायकक्षेत श्रीनगर, वागळे इस्टेट, किसन नगर, शांतीनगर हा भाग येतो. सध्या या संघाचे 429 सदस्य आहेत. 2000 साली जेव्हा या संघाची स्थापना झाली तेव्हा श्रीनगर हा भाग अगदीच अविकसित होता. वस्ती नवी होती. फारशा नागरी सुविधा नव्हत्या. श्रीनगर ज्येष्ठ नागरिक संघाने केव्हाही वेळ घालवणे किंवा टाईमपास हा आपला उद्देश मानला नाही तर या विभागाच्या सुधारणेत संघटनेतील वृध्दानी नेहमीच क्रियाशील तडफदार भूमिका बजावली. या वस्तीकडून मुलुंडकडे जाणारा मार्ग टाटा फायबर कंपनीच्या शेजारून जात होता. तो रस्ता तेव्हा अरुंद होता. श्रीनगर ज्येष्ठ नागरिक संघाने टाटा कंपनीला कंपाउंड वाल मागे घ्यायला लावली आणि श्रमदान करून हा रस्ता रुंद केला. बाजुला वृक्षारोपण केले. ती झाडे जगवली. मध्यंतरी या विभागातील रिक्षा चालकांनी मनमानी पध्दतीने रिक्षा स्टॅण्डची जागा बदलली होती. त्यामुळे रहिवाशांना त्रास व्हायचा. वळसा घालून जावे लागे. श्रीनगर ज्येष्ठ नागरिक संघाने आरटीओ विभागात पाठपुरावा करून रिक्षा स्टँड पुन्हा सोयीच्या ठिकाणी आणला. श्रीनगर ज्येष्ठ नागरिक संघाचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे या परिसरात महानगर गॅस पाईपलाईनची सुविदा उपलब्ध करून देणे होय ! स्थानिक नगरसेवक मनोज शिंदे यांच्या पाठींब्याने व



संघाच्या पाठपुराव्यानुसार महानगर गॅसच्या कार्यालयात जिद्दीने, चिकाटीने प्रदीर्घ काळ पाठपुरावा संघाने या परिसरात महानगरची गॅस पाईप लाईन खेचून आणली. या कामामुळे या परिसरातील शेकडो गृहनिर्माण सोसायट्यांमधे श्रीनगर ज्येष्ठ नागरिक संघाचे नाव आदराने घेतले जाते. अर्थाच याच बरोबर संघातर्फे सभासदांसाठी अनेक नियमित कार्यक्रम आयोजित केले जातातच. 75 वर्षे पार करणाऱ्या सदस्यांचा, 10वी 12 वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो. विशेष सभासदांचा ज्या दिवशी वाढदिवस असतो तेव्हा कार्यकारिणी सदस्य त्याच्या घरी जाऊन अभिष्टचिंतन करतात. वाढदिवस असणारेही त्या प्रसंगी संघाला देणगी देऊन कृतज्ञता दर्शवतात. त्यातून संघाला निधी मिळतो. संघाचा वार्षिक वर्धापन दिन दरवर्षी येथील श्रीमंगल कार्यालयात साजरा केला जातो. दरवर्षी सभासदांची एक सहल नेण्यात येते. सभासदांच्या कलागुणांना वाव देणारे कार्यक्रम घेतले जातात. वारलीपाडा हा निम्नवर्गीय भाग येथून जवळ आहे. संघातर्फे दरवर्षी दिवाळीत या परिसरातील नागरिकांना फराळाची-मिठाईची पाकीटे वाटण्यात येतात. दिवाळीत या परिसरातील डाक्टर्स मंडळींचा एक गाण्याचा – संगीताचा ग्रुप आहे. त्यांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. या परिसरात 100 सोसायट्या आहेत. संघाने सर्व सोसायटी पदाधिकाऱ्याना हाउंसिंग फेडरेशनचे अध्यक्ष बोरवणकर यांचे मार्गदर्शन मिळवून दिले होते. एकूण श्रीनगर ज्येष्ठ नागरिक संघ म्हणजे वृध्द मंडळी नागरी समस्या निरसनाच्या आणि समाजसेवेच्या क्षेत्रात कशी उत्साही भूमिका बजावू शकतात याचा आदर्श आहे. इतर ज्येष्ठ नागरिक संघांनीही तसे प्रयत्न करायला हवेत.

**अध्यक्ष – विजय नागराज**
**– 83558 84243**

# कळव्याची सेकंड इनिंग बहरली

## ज्येष्ठ नागरिक संघ कळवा

ज्येष्ठ नागरिक संघ, कळवाची स्थापना 1992 साली झाली. सध्या नागेश दामले हे तिचे अध्यक्ष आहेत. या संघाच्या कार्यकक्षेत कळवा पश्चिमेतील खारेगाव, मनिषानगर, विटावा हे भाग येतात. सध्या संघाची सदस्य संख्या 1256 आहे. सदस्य दिवंगत झाल्यावर संघाला तसे कळवले जात नाही. त्यामुळे या सदस्यांपैकी काहींचे निधन झाले असावे. पण आजमितीला निदान 800 सदस्य हयात आहेत. यांपैकी अंदाजे 350 महिला सदस्या आहेत. दर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी कार्याकारिणीची बैठक होते. या संघाचे वैशिष्टय म्हणजे संघाचे स्वत:चे कार्यालय आहे. ते कळवा पश्चिमेला विक्रमनगर येथे कॅथलिक चर्चसमोर, लोकप्रतिष्ठा सोसायटी येथे आहे. ही इमारत पारसिक सहकारी बँकेचे अध्यक्ष गोपीनाथ पाटील यांनी बांधली. त्यांच्या सौजन्याने संघाला कार्यालयासाठी ही जागा मिळाली. संघातर्फे दरमहा





निदान एक कार्यक्रम सभासदांसाठी घेतला जातो. त्यात व्याख्याने, भजने, कोजागिरी जागरण, चैत्र महिला हळदी-कुंकू वगैरे कार्यक्रम होतात. तसेच अनेक व्याख्यानेही आयोजित केली जातात. नुकतेच नचिकेत दीक्षित यांचे भगवान कृष्णावरील व्याख्यान संपन्न झाले. तसेच सुबोध चितळे यांचा एकपात्री प्रयोगही आयोजित करण्यात आला होता. संघातर्फे दरवर्षी सभासदांची सहल नेली जाते. आजवर खोपोली येथील गगनगिरी महाराजांचा आश्रम, देहू-आळंदी, भिवंडी जवळची रिसार्टस येथे सहली नेण्यात आल्या होत्या. संघ सभासदांचा मेडीकल चेकअप कॅम्प आयोजित करतो. लवकरच संघातर्फे रुग्णोपयोगी साहित्य पुरवण्याचा उपक्रम सुरू होणार आहे. त्याच वाकर, कमोड, व्हीलचेअर वगैरे वस्तू गरजुंना भाड्याने देण्यात येतील. संघाच्या सभासदांना भाड्यात जास्त सवलत दिली जाणार आहे. वृध्दांचे रेल्वे कन्सेशन मध्यंतरी रेल्वेने बंद केले होते. या कामी संघाने पाठपुरावा करून ती सवलत पुन्हा मिळवली, वृध्दांचे व्यापक स्तरावरील प्रश्न सोडवण्यासाठीही ज्येष्ठ नागरिक संघ, कळवा प्रयत्नशील असतो.

**अध्यक्ष – नागेश दामले**
**– 87793 76118, 98198 55517**

श्री रामकृष्ण नेत्रालय
Super Speciality Eye Care



# ज्येष्ठांचा असाही 'ऋतु'

## ऋतुपार्क ज्येष्ठ नागरिक सेवा संस्था, ठाणे ( प )





ऋतुपार्क ज्येष्ठ नागरिक सेवा संस्थेची स्थापना 2006 साली श्री. देसाई यांनी केली. आज या संस्थेचे 165 सभासद आहेत. त्यांपैकी 87 महिला व 78 पुरूष सदस्य आहेत. दर महिन्याला कार्यकारिणीची एक बैठक होते. त्यात पुढील कार्यक्रमांचे नियोजन केले जाते. दर महिन्याला व्याख्यान, कथाकथन, कीर्तन अशा प्रकारचे क्रार्यक्रम ठेवले जातात. आजवर अनेक मान्यवरांनी या ज्येष्ठ नागरिक संघात हजेरी लावली आहे. कवीवर्य प्रवीण दवणे, माधवी घारपुरे, मेघना मेहेंदळे यांचा समावेश आहे. सुबोध चितळे यांचा एकपात्री कार्यक्रमही संस्थेतर्फे आयोजित करण्यात आला होता. संस्थेची ख्याती ऐकून अनेक कलाकार संस्थेशी संपर्क साधतात. त्यांचे कार्यक्रम ठेवले जातात. संस्थेतर्फे लहान मुलांसाठी चित्रकला, धावण्याच्या स्पर्धा घेतल्या जातात. दर महिन्याच्या 5 तारखेला संस्थेतर्फे डॉ. दाते यांच्या सहयोगाने सभासदांची रक्त तपासणी केली जाते. त्यासाठी फक्त 50/- रु आकारले जातात. सर्व सभासदांच्या वाढदिवसाच्या दिवशी कार्यकारिणी सदस्य त्यांच्या घरी जाऊन पुष्पगुच्छ, शुभेच्छाकार्ड देऊन त्यांचे अभिष्टिचिंतन करतात. 10 वी, 12 वी व गुणवत्ता परिक्षांत यश मिळवलेल्या विद्यार्थ्याचा संस्थेतर्फे सत्कार केला जातो. दरवर्षी एका एक दिवसीय सहलीचे आयोजन केले जाते. अलीकडेच कर्जतच्या सद्गुरू वामनराव पै यांच्या जीवनविद्या मिशनच्या आश्रमात संस्थेची सहल गेली होती. संस्थेत महिला सभासदांची संख्या लक्षणीय असल्याने संस्थेतर्फे महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. तसेच 22 जानेवारी हा वर्धापन दिनही साजरा केला जातो. ऋतूपार्क सोसायटीत स्वरांजली हा एक गाणी सादर करणाऱ्यांचा समूह आहे. त्यांचा कार्यक्रम दिवाळी पहाटेला आयोजित केला जातो. दिवाळीत सभासदांना मिठाई व शुभेच्छापत्र वाटप केले जाते. ऋतुपार्क सोसायटीचे एक क्लब हाऊस आहे. त्याच्या सभागृहात संस्थेचे सर्व कार्यक्रम होतात. ऋतुपार्क ही सोसायटी पटेल बिल्डर्स यांनी बांधलेली आहे. त्यांनी इतरही काही संकुले बांधली आहेत. त्या सर्व संकुलांमधील सांस्कृतिक घडामोडींबाबत त्यांचे ऋतु लाईफ नावाचे मासिक निघते. ऋतुपार्क ज्येष्ठ नागरिक सेवा संस्थेच्या कार्याला त्यात प्रसिध्दी दिली जाते. संस्थेचे सध्याचे अध्यक्ष बाळासाहेब कुलकर्णी हे 83 वर्षांचे आहेत. गेली 8 वर्षे ते संस्थेचे अध्यक्ष आहेत. ते गीता-वेद-उपनिषदांचे जाणकार आहेत. ते वेदांतावर प्रवचने देतात. त्यांचेही कार्यक्रम अनेकदा संस्थेत होतात. व्यास क्रिएशन तर्फे दिला जाणारा ज्येष्ठ रत्न पुरस्कार 2021 साली त्यांना दिला गेला होता.

**अध्यक्ष – बाळासाहेब कुलकर्णी**
**– 98698 56159**

# सत्तरीनंतरही 'आनंद' विहार

## आनंदविहार ज्येष्ठ नागरिक संघ , ठाणे ( पू )

ठाणे शहराच्या पूर्वेकडील भास्करनगर वगैरे भागात आनंदविहार ज्येष्ठ नागरिक संघ ही ज्येष्ठांची संघटना कार्यरत आहे. तिची स्थापना 2005 साली झाली. सध्या प्रभाकर प्रभूवालावलकर हे तिचे अध्यक्ष तर सुभाष दवणे हे सचिव आहेत. सध्या संघटनेचे 130 सदस्य आहेत. त्यांपैकी 20 महिला सदस्या आहेत. संस्थेचा स्वत:चा हाल आहे. त्यात दरमहा कार्यकारिणीची एक नियमित बैठक होते. तसेच करमणूकप्रधान गायन-प्रवचनांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. दरमहा डोळे तपासणी शिबीर घेतले जाते. 10 वी, 12वीत उत्तम गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच वयाची 70 वर्षे पूर्ण करणाऱ्या सभासदांचा सत्कार केला जातो. संघातर्फे साळुंके टुर्सच्या सहयोगाने सभासदांच्या दीर्घकालीन सहली काढल्या जातात. आजवर, सौराष्ट्र, गोवा, तिरुपती, कोकण इत्यादी ठिकाणी सहली गेल्या आहेत. यातील काही प्रवास रेल्वेने तर पर्यटनस्थळाचा स्थानिक प्रवास स्पेशल बसने होतो. दरवर्षी जनरल बॉडीची मिटींग होते. तो कार्यक्रम मोठ्या उत्साहाने आणि मोठ्या प्रमाणात आयोजित केला जातो. ते जणू सर्व सभासदांचे वार्षिक स्नेहसंमेलनच असते.

**अध्यक्ष – प्रभाकर प्रभूवालावलकर**
**– 70213 23271**



श्री रामकृष्ण नेत्रालय
Super Speciality Eye Care




Call: 82917 14838/ 75060 66769

OUR BRANCHES: GHODBUNDER ROAD | MAKHAMALI TALAO | MULUND | SEAWOODS | VASHI

Shree Ramkrishna Netralaya
Super Speciality Eye Care

www.shreeramkrishnanetralaya.com

श्री रामकृष्ण नेत्रालय
Super Speciality Eye Care



# ज्येष्ठांना गवसला सुखी जीवनाचा 'चिंतामणी'

## चिंतामणी – गावंडबाग ज्येष्ठ नागरिक संस्था

गावंडबाग परिसरातील ज्येष्ठ नागरिक अनौपचारिकरित्या रोज संध्याकाळी भेटत असत. 2016 साली त्यांनी चिंतामणी गावंडबाग ज्येष्ठ नागरिक संस्थेची स्थापना केली. 2017 साली तिचे रजिस्ट्रेशन केले गेले. सध्या सदाशिव देशमुख हे तिचे अध्यक्ष आहेत. सध्याच्या कार्यकारिणी सदस्यांमधे उत्तम तोरसकर, महादेव जाधव, विलास अध्यापक, संजय मिराशी. शर्मिष्ठा लेले, चौधरी, यादव, पाटील यांचा समावेश आहे. आजमितीला संस्थेचे 135 सदस्य असून त्यांपैकी 70 महिला आहेत दरमहा कार्यकारिणीची बैठक संपन्न होते. त्यातच पुढील महिन्याच्या कार्यक्रमांची आखणी होते. सामाजिक जाणीव वृध्दींगत करणे आणि आपल्या सभासदांच्या कलागुणांना वाव देणे ही उद्दीष्टे समोर ठेवून कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच दर महिन्याच्या 10 तारखेला नागेश डायग्नोस्टिक सेंटरच्या सहकार्याने रक्त तपासणी शिबीर घेतले जाते. इतर वेळेलाही अनेक आरोग्यविषयक कार्यक्रम, डॉक्टर्सची व्याख्याने होतात. मनोरंजनाचे, गाण्यांचे एकपात्री प्रयोगांचे, कथाकथनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. प्रवीण दवणे, दाजी पणशीकर, दा. कृ. सोमण इत्यादींची व्याख्याने संस्थेत झालेली आहेत. संस्थेतर्फे योगासनांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. संस्थेची लायब्ररी आहे. तिच्या माध्यमातून सदस्य पुस्तकांची देवाणघेवाण करतात.



वर्षातून एकदा सदस्यांची सहल नेली जाते. आजवर वज्रेश्वरी, बदलापूर येथील रिसार्ट, लोनावळा, शेगाव येथे सहली झालेल्या आहेत. गुंज नावाची एक संस्था घरातील नको असलेल्या वस्तुंचे दान गोळा करते आणि त्या वस्तु गरजू व्यक्तींपर्यंत पोचवते. चिंतामणी-गावंडबाग ज्येष्ठ नागरिक संस्था सभासदांकडून जुने कपडे, पुस्तके, उशा, सायकली वगैरे वस्तू गोळा करून गुंज संस्थेला दान देते. आमदार प्रतापराव सरनाईक यांच्याकडून संस्थेला निधी आणि उत्तम सहकार्य लाभते. संस्थेतर्फे परिसरातील झाडांची निगा राखली जाते. सध्या राजन म्हात्रे हे संस्थेचे सचिव आहेत. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष सदाशिव देशमुख हे न्यायपालिकेतून मोठ्या पदावरून निवृत्त झालेले आहेत. ते म्हणतात की सध्या प्रत्येकजण आपापल्या कोशात मग्न असतो. संस्थेचा मूळ उद्देश सभासदांना एकत्र आणून, त्यांच्यातील संवाद वाढवणे हा आहे. प्रत्येकाच्या काही समस्या असतात. इतरांशी बोलल्यावर त्यांचा ताण कमी होतो. काहीवेळा परस्पर सहकार्याने मार्गही निघतो.

**अध्यक्ष – सदाशिव देशमुख**
**– 98205 53525**

# 'निवृत्ती'च्या मंदिरी 'शिवशक्ती'चे दर्शन

## शिवशक्ती ज्येष्ठ नागरिक संस्था





शिवशक्ती ही महात्मा फुले नगर, आईमाता मंदिर, पाटील वाडी, म्हाडा वसाहत या परिसरातील ज्येष्ठ नागरिकांची संस्था आहे. तिची स्थापना नगरसेवक दशरथ पलांडे यांच्या पुढाकारने 2015 या संस्थेची स्थापना झाली. सध्या संस्थेचे 186 सभासद आहेत. त्यातील 25 टक्के महिला सदस्य आहेत. सध्या राघोजी परब हे संस्थेचे अध्यक्ष तर काशिनाथ हांडोरे हे संस्थेचे सचिव आहेत. संस्थेची दरमहा सवडीनुसार एक कार्यकारिणी बैठक होते. वृध्दांना ज्याची गरज आहे असे कार्यक्रम म्हणजे डोळे तपासणी, चष्मा वाटप, हृदय, रक्ततपासणी शिबीरे आयोजित केली जातात. तसेच करमणूकीचे, योगासने संबंधित कार्यक्रमही घेतले जातात. माधवबागेच्या सहयोगानेही काही कार्यक्रम घेतले जातात. करमणुकीच्या कार्यक्रमांत रवी घरत यांचा गाण्यांचा कार्यक्रम व सुभाष रासम यांचा भविष्यावर बोलू काही कार्यक्रम झाला होता. पूर्वी संस्थेतर्फे हास्यक्लबही चालवला जात असे. वर्षातून एकदा सहल नेली जाते. 22 जून हा संस्थेचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. महिन्याभरात ज्या सभासदांचा वाढदिवस असतो त्यांचा महिन्यातून एकदा सत्कार केला जातो. सभासदांपैकी कोणाला वैद्यकीय मदतीची गरज असेल तर डॉक्टरांकडून कोटेशन घेऊन नगरसेवकांमार्फत मदत मिळवून दिली जाते.

**अध्यक्ष – राघोजी परब – 92243 81032**
**सचिव – काशिनाथ हंडोरे – 92226 07833**



श्री रामकृष्ण नेत्रालय
Super Speciality Eye Care



# उत्तरायणात उजळल्या कर्तृत्वाच्या दिशा

## उत्तरायण सिनिअर सिटीझन्स असोसिएशन







विजयनगरी सोसायटीतील ज्येष्ठ नागरिकांची संस्था म्हणजे उत्तरायण सिनिअर सिटीझन्स असोसिएशनची स्थापना 2001 साली झाली. सध्या वैशाली कुलकर्णी तिच्या अध्यक्षा आहेत. सध्या असोसिएशनचे 80 सदस्य आहेत. दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या बुधवारी संघटनेचे सदस्य भेटतात. त्याचवेळी निरनिराळे कार्यक्रम आयोजित केले जातात. दुसऱ्या बुधवारी संस्थेबाहेरील वक्त्यांची व्याख्याने ठेवली जातात तर चौथ्या बुधवारी संघटनेतील सदस्यांच्या कलागुणांना वाव देणारे कार्यक्रम होतात. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी असोसिएशनच्या सदस्यांची एक सहल नेली जाते. वृध्दांच्या तब्येतीचा विचार करून ही सहल नेहमी एकदिवसीय असते. एका दिवसात जाऊन येता येईल अशी ठिकाणे म्हणजे कर्जत, कसारा, वसई, विरार येथे सहल नेली जाते. संस्थेचे सर्व कार्यक्रम विजयनगरी अनेक्स क्लब हाऊसच्या हालमधे होतात. या बाबतीत क्लब हाऊसच्या सर्व कमिटी मेंबर्सकडून उत्तरायण सिनिअर सिटीझन्स असोसिएशनला मनापासून सगळ्या प्रकारचे सहकार्य लाभते.

**अध्यक्षा – वैशाली कुलकर्णी – 98193 81011**

# कशिशपार्कमध्ये फुलला ज्येष्ठांचा मळा

## कशिशपार्क ज्येष्ठ नागरिक सेवा संस्था






2011 साली मकर संक्रांतीच्या दिवशी स्थानिक नगरसेवक विकास रेपाळे आणि नगरसेविका नम्रता भोसले यांच्या पुढाकाराने कशिशपार्क ज्येष्ठ नागरिक सेवा संस्थेची स्थापना करण्यात आली. सध्या महादेव गावडे हे तिचे अध्यक्ष तर बलराम नाईक सचिव आहेत. द्वारकानाथ भानुशाली, राजाराम सुर्वे, बाळाजी मोरे कार्यकारिणी सदस्य आहेत. संस्थेचे सध्या 250 सभासद आहेत. सदस्यसंख्येत सतत वाढ होत आहे. दरमहा कार्यकारिणीची एक बैठक होते आणि करमणुकीचे अनेक कार्यक्रम होतात. दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी होमिओपथिक डाक्टर प्रीती पाटील यांच्यातर्फे आरोग्य तपासणी शिबीर घेतले जाते. त्यासाठी त्या पुण्याहून येतात. संस्थेतर्फे तुळशीचे लग्न, वृक्षारोपण, माघी गणेशोत्सव, स्वागत नववर्षाचे, वर्धापन दिन आदी कार्यक्रम होतात. वयाची 75 वर्षे पूर्ण करणाऱ्या सभासदांचे आणि लग्नाला 50 वर्षे झालेल्या सदस्य दांपत्यांचे सत्कार केले जातात. मा. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब आणि ज्येष्ठ नेते नरेशजी म्हस्के साहेब यांच्या अथक प्रयत्नाने संस्थेला समुपदेशन केंद्रासाठी जागा मिळाली आहे. अंबिका योगकुटीरच्या सहकार्याने योगशिबिरे आयोजित केली जातात. संस्थेतर्फे एक वाचनालय चालवले जाते. त्यात तीन हजार मराठी, हिंदी, इंग्लिश पुस्तके आहेत. कशिशपार्क आणि शेजारील प्रभाग 19 मधील वाचकांनाही या वाचनालयाचा लाभ घेता येतो. संस्थेतर्फे कॅरम खेळण्याची सोय करण्यात आली आहे. विशेष म्हणजे संस्थेतर्फे एक भाजीमळा लावण्यात आला आहे. त्यात वांगी, माठ व अडुळसा, बेल, काळी मिरी, तेजपत्ता, नागवेल इत्यादी औषधी वनस्पतींची लागवड केलेली आहे. संस्थेतर्फे एक रोपवाटीकाही चालवली जाते. त्यात आंबा, फणस, ताडगोळे यांची रोपे रुजवली जातात. ती इतरत्र लागवडीसाठी वाटली जातात. शहरातील विद्यार्थ्यांना निसर्गाची-शेतीची-पर्यावरणाची काही माहिती नसते. त्यांना निसर्गविषयक जाणीव व्हावी म्हणून संस्थेतर्फे भाताची लागवड केली जाते. दसऱ्याच्या तोरणात वापरल्या जाणाऱ्या लोंब्या सोसायटीतील सदस्यांना वाटल्या जातात. कशिशपार्कमधे एक मंदिर आहे. त्या मंदिरातील निर्माल्यापासून सेंद्रिय खत बनवले जाते. संस्था फक्त पर्यावरणविषयकच नव्हे तर नागरी समस्या निवारणाबाबतही कार्य करते. मध्यंतरी आरटीओ च्या भाग 5 व 4 चा प्रश्न निर्माण झाला होता. एका भागातील रिक्षा दुसऱ्या भागात जात नसत. त्याचा नागरिकांना त्रास होत असे. तो प्रश्न संस्थेने पुढाकार घेऊन सोडवला. तसेच दादरकडे जाणाऱ्या 69 क्रमांकाच्या बसचा थांबा कसिशपार्कला नव्हता. संघटनेने बेस्टशी संपर्क व पाठपुरावा करून त्या कशिशपार्क येथे थांबा मिळवून घेतला. महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्राने संस्थेच्या कार्याची गौरव केला होता. वृध्दत्व म्हणजे निवृत्तीचा, निवांतपणाचा काल हा समज खोटा ठरवून कशिशपार्क ज्येष्ठ नागरिक सेवा संस्था अशा तऱ्हेने विविध क्षेत्रांत जोमाने भरीव कार्य करीत आहे.

**अध्यक्ष – महादेव गावडे – 99675 19190**
**सचिव – बलराम नाईक – 98691 34100**

श्री रामकृष्ण नेत्रालय
Super Speciality Eye Care



# निवृत्तीच्या क्षितिजावर स्नेहाची सांज



सांजस्नेह ज्येष्ठ नागरिक संघ



ठाण्यातील ब्रह्मांड, घोडबंदर रोड येथील ज्येष्ठ नागरिकांची संघटना म्हणजे सांजस्नेह ज्येष्ठ नागरिक संघ होय. या संस्थेची स्थापना 18 मार्च 1999 रोजी श्री. पारसकर यांनी केली. सध्या या संघाचे 373 सभासद आहेत. त्यातील महिला सभासदांची संख्या लक्षणीय आहे. सध्या ज्योती दोंदे या संघाच्या अध्यक्षा तर सुनीला वैद्य या सचिव आहेत. दर महिन्याच्या 13 व 28 तारखेला कार्यकारिणीची आणि 1 व 15 तारखेला सभासदांची बैठक होते. गेली 24 वर्षे नेमक्या याच तारखांना बैठका होत आहेत. संघटनेतर्फे रामकृष्ण नेत्रालयाच्या सहकार्याने डोळे तपासणी शिबिरे आयोजित केली जातात. पूर्वी हेल्पेज इंडीया मार्फत ज्युपिटर हॉस्पिटलचे डॉ. विजय सुरासे हेही नेत्रतपासणी करत असत. संघातर्फे सभासदांच्या मनोरंजनासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यात जादुचे प्रयोग, नृत्य, कथाकथन, हिंदी-मराठी गाणी, कराओके गाणी तसेच अंताक्षरी स्पर्धांचा समावेश असतो. हेमंत साने, मेघना साने, मंजिरी देवरस यांच्या कथाकथनाचे कार्यक्रम झालेले आहेत. काही वेळा हिंदीतही कथाकथनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. प्रख्यात व्याख्याते दाजीशास्त्री पणशीकर यांच्या 90 व्या वाढदिवशी संघाने त्यांचे व्याख्यान ठेवले होते. तसेच चंद्रशेखर ठाकूर यांचे शेअर मार्केट व गुंतवणुकीसंबंधी व्याख्यानही झाले होते. संघटनेतर्फे कोविडपूर्व काळात सभासदांची एक दिवसीय सहल नेली जात असे. बदलापूर, जीवदानी, टिकुजीनी वाडी, टिटवाळा-शहाड येथे पूर्वी सहली गेल्या होत्या. संघटनेचे स्वतःचे सभागृह आहे. मा. लोकनेते देवरामजी भोईर यांच्या आशीर्वादाने हे 200 माणसे बसू शकतील असे सभागृह संस्थेला लाभलेले आहे. त्याचे नाव कै. जानकीबाई लक्ष्मण भोईर सभागृह आहे. संघटनेतील अनेक सभासदांना कॅरम खेळण्याची आवड आहे. त्यांच्यासाठी सभागृहात चार कॅरम बोर्डची व्यवस्था केली आहे. कॅरमच्या स्पर्धाही घेतल्या जातात व बक्षिसे दिली जातात. दर गुढीपाडव्याला संघाचा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. 1 ऑक्टोबरला म्हणजे ज्येष्ठ नागरिक दिनी संघातील 75, 80, 90 वर्षे पूर्ण करणाऱ्या सभासदांचा व लग्नाला 50 व 60 वर्षे पूर्ण करणाऱ्या जोडप्यांचा सत्कार केला जातो. संघाच्या कार्यक्षेत्राजवळ मानपाडा येथे ठाणे महापालिकेची शाळा क्र. 7 आहे. त्या शाळेत निम्न मध्यमवर्गातील मुले शिकतात. या शाळेतून 10 वीच्या परिक्षेत पहिल्या व दुसऱ्या येणाऱ्या विद्यार्थ्यांची शाळेकडून माहिती घेऊन सांजस्नेह ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यकारिणी सदस्य विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांचा सत्कार करतात. त्यांना काही आर्थिक मदत केली जाते. अशा तऱ्हेने आयुष्याच्या सांजवेळी सांजस्नेह ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य सभासदांच्या आणि एकूणच समाजजीवनात स्नेहदीप प्रज्वलित करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

अध्यक्षा – ज्योती दोंदे – 98693 53429
सचिव – सुनीला वैद्य – 87792 48533

# समाजाशी जुळली 'दोस्ती'ची घट्ट नाळ

दोस्ती इम्पेरिया सिनिअर सिटीझन्स ग्रुप



दोस्ती इम्पेरिया सिनिअर सिटीझन्स ग्रुप हा घोडबंदर रोडवरील दोस्ती कॉम्प्लेक्स मधील ज्येष्ठ नागरिकांचा संघ आहे. दोस्ती कॉम्प्लेक्स मधे 30 मजल्यांचे 7 टावर आहेत. या कॉम्प्लेक्स मधील ज्येष्ठ नागरिकांची ही संघटना आहे. तिची स्थापना 1 मार्च 2017 रोजी मोहन कारगावकर यांनी केली. हा भाग घोडबंदर रोडवर आर मॉल च्या मागे येतो. मिलिंद जोशी यांची ही या संघाच्या स्थापनेत मोलाची भूमिका होती. सध्या या संघाचे 171 सभासद आहेत. दर महिन्याला संघातील सदस्यांचे वाढदिवस, लग्नाची अ@निव्हर्सरी साजरी केली जाते. या प्रसंगी सभासदाला शुभेच्छापत्रक -पुष्पगुच्छ दिले जाते. त्या प्रसंगी त्या सभासदांना बोलते करण्याचा प्रयत्न केला जातो. सोसायटीचा एक बॅन्क्वेट हाल आहे. तसेच एक अम्पी थिएटरही आहे. त्याची क्षमता 120 माणसांची आहे. त्यात संघाचे सर्व कार्यक्रम होतात. सभासद नेहमी हौजी खेळतात. रोज सकाळी योगासने केली जातात. प्रार्थना, ध्यानधारणा, प्राणायाम योगनिद्रा म्हणजे शवासन केले जाते. रामकृष्ण नेत्रालय हे दोस्ती इम्रेरियाच्या कॉम्प्लेक्स मधेच आहे. त्यांच्या सहकार्याने नेत्रतपासणी शिबिरेही आयोजित केली जातात. दर महिन्याच्या 10 ते 15 तारखेदरम्यान बाहेरच्या एखाद्या वक्त्याला बोलावले जाते. प्राची गडकरींचे संतसाहित्यावरील व्याख्यान, चंद्रशेखर ठाकूर यांचे नाटकातील सौंदर्यस्थळे, तसेच डा आनंद नाडकर्णींच्या सहकारी मधुरा बापट याची व्याख्याने संस्थेत झाली आहेत. संघटनेतर्फे दिवाळी पहाट साजरी केली जाते. तेव्हा बाहेरचे नामवंत गायक बोलवले जातात. त्यानंतर भोजनाचा जंगी कार्यक्रम असतो. दरवर्षी एक मान्सून व एक विंटर पिकनिक आयोजित केली जाते. संघटनेतर्फे काही परदेश सहलीही नेण्यात आल्या होत्या. 2018 मधे मधे दुबईला 48 सदस्यांची टूर झाली. 2020 ला न्यूझीलंडला 26 सदस्यांची सहल गेली होती. संघटनेची एक किटी बँक आहे. वाढदिवसाच्या दिवशी सभासद किटी बँकेत काही देणगी देतात. त्यातून वृध्दाश्रमात, अनाथाश्रमांत जाऊन देणगी दिली जाते. नुकतीच कॅन्सरपीडित मुलांच्या संस्थेला काही खेळणी व गेम्स दिले गेले. संस्थेचे सध्याचे अध्यक्ष मोहन कारगावकर हे भेल या सरकारी कंपनीतून जनरल मॅनेजर पदावरून निवृत्त झालेले आहेत. त्यांच्या पत्नी प्रीती याही एलआयसीतून निवृत्त आहेत. संघटनेतील इतर सर्व सभासद उच्चभ्रू वर्गातील आहेत. काम्पेक्समधे दोन कट्टे आहेत. त्यावर रोज महिला व पुरूष सभासद नियमितपणे भेटतात.

**अध्यक्ष – मोहन कारगावकर – 98672 13449**

ठाणेवैभव

श्री रामकृष्ण नेत्रालय
Super Speciality Eye Care

ज्येष्ठोत्सव

# Who is at risk of Glaucoma?



- People Over 60.
- Steroid Users.
- Eye Injury.
- Diabetes.
- Hypertension.

www.shreeramkrishnanetralaya.com | Call: 82917 14838/ 75060 66769

OUR BRANCHES: GHODBUNDER ROAD | VASHI
MAKHAMALI TALAO | MULUND | SEAWOODS

Shree Ramkrishna Netralaya
Super Speciality Eye Care

श्री रामकृष्ण नेत्रालय
Super Speciality Eye Care



# हास्यातून सर केला अडचणींचा 'एव्हरेस्ट'

## एव्हरेस्ट वर्ल्ड लाफ्टर क्लब



ठाणे शहरातील एव्हरेस्ट सोसायटीत 20 मजल्यांच्या 16 बिल्डींग्ज आहेत. त्या सोसायटीत साधारणपणे 1300 कुटुंबे राहतात. या सोसायटीतील एक रहिवासी अमर पाटील यांनी पुढाकार घेऊन एव्हरेस्ट वर्ल्ड लाफ्टर क्लबची स्थापना केली. सध्या या क्लबचे 65 सदस्य आहेत. त्यातील दोन-चार जण सोडले तर इतर सर्व सभासदांचे वय 60 च्या पुढे आहे. तेव्हा एका अर्थाने हा एव्हरेस्ट वर्ल्ड लाफ्टर क्लब म्हणजे एक ज्येष्ठ नागरिक संघच आहे. विमला थापर या सदर क्लबच्या सेक्रेटरी आहेत. सोसायटीत एक क्लब हाऊस आणि गार्डन आहे. या काम्प्लेक्समधील सर्व ज्येष्ठ सदस्य रोज सकाळी पावणे सात ते साडे सात या वेळेत गार्डनमधे मार्निंग वाक करतात. त्यानंतर साडे सात ते आठ या वेळात शरीर संचलनात्मक व प्राणायाम वगैरे श्वसनाचे व्यायाम करतात. नंतर सूर्यवंदना, ओंकार उच्चारण, गायत्री मंत्र म्हणतात. गाणी म्हणतात. जोक्स, हास्यविनोद सांगितले जातात. एकूण या सोसायटीतील सर्व ज्येष्ठ सभासद एकमेकांच्या सहवासात आनंदाने, मजेत राहतात. आपल्या आयुष्यात रंग भरतात. हसण्यामुळे मन आनंदी होते. हृदयाचे स्नायू मोकळे होतात. आपोआप दीर्घ श्वसन होते. या तत्त्वाला अनुसरून या लाफ्टर क्लबमधे हसण्याचे विविध प्रकार म्हणजे रावण लाफ, व्हीलन लाफ, हिरो लाफ वगैरे केले जातात. एव्हरेस्ट सोसायटीचे एक सांस्कृतिक मंडळ आहे. त्यांच्यातर्फे तसेच या लाफ्टर क्लबच्या संघाच्या सदस्यांद्वारे सर्व प्रकारचे हिंदू सण मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. सांस्कृतिक मंडळाच्या कार्यक्रमांत लाफ्टर क्लबचे सभासद सक्रीय भूमिका निभावतात. गोविंदा, गणपती, नवरात्र, दिवाळी आदी सण साजरे करतात. नवरात्रात विविध स्पर्धा होतात. क्लबच्या सर्व सभासदांचे वाढदिवस मोठ्या धुमधडाक्यात साजरे केले जातात. वाढदिवसांच्या वेळी संस्कृतमधे शुभेच्छापर गीत गायले जाते. त्याचे शब्द ' शुभ जन्म दिवस तुभ्य ', असे आहेत. या क्लबमधे हिंदू संस्कृतीची जोपासना केली जाते. सर्व हिंदू सण मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. क्लबतर्फे वर्षातून एक-दोन सहलीही आयोजित केल्या जातात. वृध्दाश्रम, अपंगाश्रम, आदिवासी पाडे या ठिकाणी भेट देऊन गरजुंना उपयुक्त वस्तुंचे वाटप केले जाते. एकूण हे सर्व ज्येष्ठ नागरिक अतिशय आनंदाने जगतात. कुठल्याही प्रकारचे टेंशन-ताण न घेता आपल्या आयुष्याची संध्याकाळ एन्जॉय करतात. मजेत जगतात.

**अध्यक्ष – अमर पाटील – 99200 90590**

# 'शिवाई'ची वाटचाल एक तपाकडे

## शिवाई ज्येष्ठ नागरिक संस्था




ठाणे पश्चिमेकडील शिवाईनगर, वर्तकनगर, देवदासनगर या परिसरात शिवाई ज्येष्ठ नागरिक संस्था कार्यरत आहे. तिची स्थापना नंदकुमार श्रीपाद नलावडे यांनी 2012 साली केली. 2013 साली तिची नोंदणी केली गेली. सध्या या संघटनेचे 230 सदस्य आहेत. सध्या गोपाळ गुरव हे अध्यक्ष, नंदकुमार नलावडे उपाध्यक्ष तर अनिल देशपांडे सेक्रेटरी आहेत. दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी सर्व सभासदांची मिटींग होते. त्यात ज्या सभासदांचे त्या महिन्यात वाढदिवस असतात त्यांचे जन्मदिन साजरे केले जातात. त्या निमित्ताने संबंधित सदस्याला बोलते करण्याचा प्रयत्न केला जातो. गाणी, नकला सादर केल्या जातात. आयुष्यातील रोचक, अविस्मरणीय आठवणी शेअर केल्या जातात. वयाची 80 वर्षे पूर्ण करणाऱ्या सदस्यांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार केला जातो. विशेष प्रसंगी कॉसमॉस पॅराडाईझ चा हाल भाड्याने घेतला जातो. वर्षातून एकदा एक दिवसीय सहल काढली जाते. संघटनेची फीस वर्षाला शंभर रुपये इतकी माफक आहे फेसकॉम ही महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिक संघांची शिखर संघटना आहे. ही संघटना महाराष्ट्र फेसकॉम शी संलग्न आहे.





**उपाध्यक्ष – नंदकुमार श्रीपाद नलावडे**
**81084 03213**

श्री रामकृष्ण नेत्रालय
Super Speciality Eye Care



# उत्साहाची किरणे पसरली, (सु)प्रभात झाली!

## सुप्रभात ज्येष्ठ नागरिक संघ







ठाणे शहरातील समतानगर परिसर, रेमण्ड कंपनी गेट, कॅडबरी ते येऊर, म्हाडा, वर्तक नगर, शिवाईनगर, रामचंद्र नगर, वैतीवाडी, काजूवाडी या परिसरातातील ज्येष्ठ नागरिकांची सुप्रभात ज्येष्ठ नागरिक संघ ही संस्था कार्यरत आहे. शांताराम शिवराम उर्फ भाई यादव हे सध्या तिचे अध्यक्ष आहेत. या संघटनेला स्थानिक आमदार प्रतापराव सरनाईक यांचे भरघोस पाठबळ लाभते. ते संघटनेचे प्रमुख आश्रयदाते, मार्गदर्शक आहेत. त्यांचे पिताश्री बाबुराव सरनाईक हेही या संघटनेचे सभासद होते. अध्यक्ष भाई यादव काही काळ आमदार प्रतापराव सरनाईक यांच्या कार्यालयाचे प्रमुख होते. ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे आणि डॉ. आनंद नाडकर्णी सहीत लोकमतचे वार्ताहर मिलिंद भागवत यांचे वडील आनंदराव भागवत तसेच संगीत विशारद मीना कुलकर्णी, रांगोळीकर जोशी आदी अनेक मान्यवर संघटनेचे सभासद आहेत. दर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात संस्थेच्या सभासदांची बैठक होते. या संघटनेचे आजमितीला 450 हयात सदस्या आहेत. मासिक बैठकीत सदस्यांचे वाढदिवस साजरे केले जातात. तसेच व्याख्याने व इतर करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले जातात. आपल्या सभासदांना व्यक्त होण्याची संधी दिली जाते. विशेष म्हणजे संघटनेतर्फे गेली अनेक वर्षे सातत्याने वार्षिक विशेषाक प्रसिध्द केला जातो. त्यात संस्थेतीलच लेखक, कवी यांचे लेख छापले जातात. त्यांनी लेखन करावे म्हणून अध्यक्ष भाई यादव प्रोत्साहन देतात. संघटनेतर्फे विविध ठिकाणी सहली नेल्या जातात. आजवर रायगड, शेगाव, भंडारदरा, इत्यादी ठिकाणी सहली गेलेल्या आहेत. सहलींच्या बाबतीतही आ. प्रतापराव सरनाईक सर्व तऱ्हेचे सहकार्य आणि व्यवस्था करतात. संघटनेतर्फे ठाणे ते भाईंदर परिसरातील सर्व ज्येष्ठ नागरिक संघांचे संमेलनही अनेकदा भरवण्यात आले होते. रेमण्ड मेन गेटसमोर एक वेल्फेअर सेंटर आहे. त्यात संस्थेचे सर्व कार्यक्रम होतात. तिथे कॅरम खेळण्याची सोयही आहे. तसेच गाण्यांच्या भेंड्या, लहानपणीच्या लगोऱ्या, संगीत खुर्ची वगैरे खेळांची क्रीडास्पर्धा भरवली जाते. संस्थेचा हॉल दिवसभर इतर सामाजिक संस्थांना म्हणजे अंबिका योग कुटीरच्या योगविषयक कार्यक्रमांना, तबला क्लाससाठी व भरतनाट्यम प्रशिक्षणासाठी दिला जातो. रोज संध्याकाळी 5 ते 8 या वेळेत संघटनेचे सभासद या हालमधे भेटतात व गप्पागोष्टी करतात. एकूण ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्याची संध्याकाळ आनंददायी करण्यासाठी सुप्रभात ज्येष्ठ नागरिक संघ सातत्याने प्रयत्नशील असतो.

**अध्यक्षा – शांताराम शिवराम उर्फ भाई यादव**
**– 993303 83180**

# ओंकारातून उमटले समाजभान

## ओंकार ज्येष्ठ नागरिक संघ

ठाणे पश्चिमेकडील मुख्यत सावरकर नगर, वर्तकनगर, उपवन परिसरातील ज्येष्ठ नागरिकांची संघटना म्हणजे ओंकार ज्येष्ठ नागरिक संघ होय. याची स्थापना 4 एप्रिल 2011 रोजी झाली. स्थापना करण्यात विष्णू आणि आसावरी फडणीस या दांपत्याची आणि कै. विलास पांडे यांचा सिंहाचा वाटा होता. सध्या या संस्थेचे 266 सदस्य आहेत. त्यांपैकी निदान 175 सभासद सक्रीय आहेत. दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी संघटनेचे सर्व सदस्य एकत्र जमतात. महापालिकेने त्यांना एक सभागृह दिले आहे. त्याचे नाव प्रबोधनकार ठाकरे नाना-नानी सभागृह असे आहे. संस्थेचे सर्व कार्यक्रम इथे होतात. मासिक बैठकीत आध्यात्मिक वाचन, गायन, संतसाहित्यावर चिंतन, भजन वगैरे कार्यक्रम होतात. तसेच दर महिन्याला एक कार्यक्रम बाहेरच्या वक्त्यांना बोलावून केला जातो. ज्येष्ठ नागरिकांच्या महाराष्ट्र, राष्ट्रीय स्तरावरील संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची आणि विविध विषयांवर बाहेरील वक्त्यांची व्याख्याने आयोजित केली जातात. सभासदांचे वाढदिवस आणि वयाची 80 वर्षे व लग्नाला 50 वर्षे पूर्ण झालेल्या दांपत्यांचे सत्कार केले जातात. सभासदांच्या क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात. ओंकार ज्येष्ठ नागरिक संघाचा मुख्य भर हा सामाजिक उपक्रमांवर असतो. ओंकार ज्येष्ठ नागरिक संघ हा आपल्या परिसरातील नागरी समस्या सोडवण्यातही अग्रेसर




असतो. लोकमान्य नगर येथील मनपा बस डेपोबाबत काही समस्या होत्या. डेपोची अवस्था वाईट झाल्यामुळे नागरिकांना रांग लावण्यात अडचण येत असे. ओंकार ज्येष्ठ नागरिक संघाने प्रवाशांची आणि प्रशासनाची बाजू समजून घेऊन त्या समस्या दूर करण्यासाठी पुढाकार घेतला. अर्जविनंती, पाठपुरावा करून डेपोच्या समस्या निवारण केल्या. त्या दूर होईपर्यंत संघटनेचे सभासद सकाळच्या गर्दीच्या वेळी डेपोत हजर राहून प्रवाशांना रांग लावण्याची शिस्त लावीत असत. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने ओला व सुका कचरा संकलनाबाबत पथनाट्यांद्वारे जनजागृती केली जाते. पथनाट्ये बसवण्याबाबत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे सहकार्य घेतले जाते. गणपतीच्या दरम्यान संस्थेचे सभासद कागदी पिशव्या तयार करून निर्माल्य संकलनासाठी स्थानिक नागरिकांना मोफक वाटतात. त्या पिशव्यांवर संस्थेचे नाव आणि ' प्लास्टीक पिशव्यांचा वापर टाळा, प्रदूषणाला घाला आळा ' , हा संदेश छापलेला असतो. संघटनेतर्फे दरवर्षी दिवाळीत आदिवासी पाड्यातील रहिवाशांना फराळ, सुस्थितीतील जुने कपडे, चादरी, उशा यांचे वाटप केले जाते. एकदा अग्निशमन विभागाच्या सहकार्याने आणीबाणीची परिस्थिती आणि आग लागल्यावर करायच्या उपाययोजना याबाबतचा प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दरवर्षी सभासदांच्या एक किंवा दोन सहली नेल्या जातात. आजवर संस्थेतर्फे वज्रेश्वरी-गणेशपुरी, वसई, विरार पट्टा, भाईंदरची केशवसृष्टी, पॅगोडा, खडवली येथील स्वामी समर्थ मठ, वृध्दाश्रम, जैन तीर्थक्षेत्र मानस मंदिर उपवन येथील अनाथाश्रम, लोनावळ्यातील मनशक्ती केंद्र आदी ठिकाणी सहली नेण्यात आलेल्या आहेत. शिवनेरी किल्ला, गोंदवले येथेही सहली झाल्या आहेत. माजी नगरसेविका शेंदरकर बाई आणि विद्यमान नगरसेवक दिलिप बारटक्के यांच्याकडून संघाला भरघोस सहकार्य लाभते.

**कार्यवाह – आसावरी फडणीस – 99202 04174**

श्री रामकृष्ण नेत्रालय
Super Speciality Eye Care



# सप्तसुरांनी सजले 'ब्रह्मांड'




साधारणत: 2000 सालापासून ब्रह्मांड परिसर विकसित होऊ लागला. तो ठाणे शहराचे एक उपनगर म्हणून ओळखला जाऊ लागला. हा परिसर मूळ शहरापासून काहीसा दूर आणि तुटक असल्यामुळे येथील नागरिकांना आपली सांस्कृतिक भुक भागवण्यासाठी मुख्य शहरात यावे लागायचे. त्यासाठी खुप यातायात व खर्च करावा लागायचा. वृध्दांना, ज्येष्ठाना, गृहिणींना सांस्कृतिक-साहित्यिक कार्यक्रमांसाठी दरवेळी शहरात जाणे शक्य नसायचे. ब्रह्मांड परिसरातील नागरिकांची ही अडचण लक्षात घेऊन या परिसरातील एक उत्साही नागरिक राजेश जाधव तसेच महेश जोशी, ऋतुजा देशपांडे यांनी ब्रह्मांड कट्टा या मुक्त व्यासपीठाचा पाया रचला. ही वस्ती नवी असल्याने पूर्वी येथे वाहतुकीची साधाने, बससेवा तुरळक होती. या संघटनेची स्थापना मुळात वाहतुकविषयक समस्या सोडवण्यासाठी झाली होती. मात्र काळाच्या ओघात 2000 साली लावलेल्या या रोपट्याचा आता मोठा वटवृक्ष झालेला आहे. त्यांच्यासमोर ठाण्यातील भास्कर नगर येथील आचार्य अत्रे कट्ट्याचा आदर्श होता. सुरूवातीपासूनच या कट्ट्याला दैनिक ठाणे वैभवचे संपादक मा. मिलिंद बल्लाळ, ज्येष्ठ साहित्यिक दाजी पणशीकर, बापू भोगटे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे रुपांतर एका bविविधांगी सांस्कृतिक चळवळीत झाले आहे. त्याच्या अनेक शाखा विविध क्षेत्रांमध्ये लक्षणीय कार्य करीत आहेत. आजवर या कट्ट्याने अनेक कलाकार घडवले आहेत. स्थानिकांना प्रोत्साहन देणे हे ब्रीद या कट्ट्याने कायम जपले आहे. ज्येष्ठ चित्रकार विजयराज बोधनकर यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या ब्रह्मांड वाचन कट्ट्यादवारे लुप्त होत चाललेली वाचन संस्कृती जोपासण्यासाठी साहित्यिक आणि दर्जेदार साहित्याचे अभिवाचनपर कार्यक्रम घेतले जातात. ब्रह्मांड महिला कट्ट्याच्या रुपाने बहरलेल्या शाखेद्वारे महिलाविषयक निरनिराळे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यात पारंपारिक महिलालक्षी कार्यक्रमांच्या पलीकडे




जाऊन महिलांना व्यवसाय मार्गदर्शन आणि उपलब्ध संधी यांचीही जाणीव करून दिली जाते. परिसरातील एक संगीतप्रेमी अरूण दळवी यांच्या अध्यक्षतेखालील ब्रह्मांड संगीत कट्टटयाच्या माध्यमातून परिसरातील गायक आणि संगीतप्रेमी नागरिकांसाठी एक नवे व्यासपीठ निर्माण झाले आहे. सध्या 350 कलाकार त्यात सहभागी आहेत. आरोग्यविषयक बाबतीत संस्थापक राजेश जाधव यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या मॉर्निंग -इव्हिनिंग वॉकर्स क्लबद्वारे आरोग्यविषयक विविध उपक्रम राबवले जातात. त्यात परिसरातील रहिवाशी डॉक्टर्सचा मोलाचा सक्रीय सहभाग असतो. ब्रह्मांड कट्ट्याची दिवाळी पहाट ही रसिकजनांसाठी मोठी सांस्कृतिक मेजवानीच असते. संघटनेतर्फे विविध क्षेत्रांत लक्षणीय कामगिरी करणाऱ्या तरुणांना युवा पुरस्कार देऊन गैरवले जाते. योगगुरू बापू भोगटे यांच्या मार्गदर्शनानुसार ब्रह्मांड कट्ट्यावर दर रविवारी मोफत योग वर्ग घेण्यात येतात. या कट्ट्याचे एक युट्युब चॅनेलही आहे. त्यालाही परिसरातील नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळतो. एकूण ब्रह्मांड कट्टा ही आता विविध क्षेत्रांत कार्य करणारी एक रसरशीत, फोफावलेली कलाक्षेत्राची सांस्कृतिक चळवळ बनली आहे.

**अध्यक्ष – राजेश जाधव**

**- 98206 56463**


Shree Ramkrishna Netralaya
Super Speciality Eye Care
#BeUnstoppable
WITH LASIK
DON'T LET SPECTACLES
STOP YOUR PASSION
Call: 82917 14838/ 75060 66769
OUR BRANCHES: GHODBUNDER ROAD |
MAKHAMALI TALAO | MULUND |
SEAWOODS | VASHI
www.shreeramkrishnanetralaya.com

श्री रामकृष्ण नेत्रालय
Super Speciality Eye Care



# एकवीरेची 'सावली', ज्येष्ठांना सांभाळी

## सावली सिनियर सिटिझन्स असोसिएशन





ठाण्याच्या श्रीरंग – वृंदावन सोसायटी या परिसरातील ज्येष्ठ नागरिकांची सावली सिनिअर सिटीझन्स असोसिएशन ही संघटना आहे. तिची स्थापना 1990 साली झाली. सध्या उल्का चव्हाण तिच्या अध्यक्षा आहेत. संघटनेचे एकूण 70 सभासद आहेत. त्यांपैकी 100 सक्रीय आहेत. ठाण्याचे माजी महापौर अनंत तरे साहेब यांच्या निवासस्थानासमोर तरे कुटुंबियांचे एकवीरा देवीचे देऊळ आहे. त्याच्या प्रांगणात या संघटनेचे सर्व कार्यक्रम होतात. तरे परिवाराने ती जागा वापरण्याची या संघटनेला परवानगी दिलेली आहे. याच ठिकाणी दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी संस्थेच्या सर्व सभासदांची नियमित बैठक होते. त्यात त्या महिन्यात ज्या सभासदांचे वाढदिवस असतात त्यांचे जन्मदिन साजरे केले जातात. वाढदिवसाचा कार्यक्रम झाल्यानंतर एखाद्या बाहेरच्या वक्त्याचे व्याख्यान ठेवले जाते. अलीकडेच यामिनी पाणगावकर यांचे रावणायन, प्रसाद चाफेकर यांचे महाराणा प्रताप, अमेरिकेतील माधुरी पाटणकर यांचे ‘ वृध्दांनी दैनंदिन जीवनात घ्यायची खबरदारी ’ या विषयांवर व्याख्याने झाली. सुबोध चितळे यांचा ‘असा मी असामी ’ हा एकपात्री प्रयोगही या संस्थेत संपन्न झाला होता. याच संघटनेची एक महिला शाखा आहे. तिच्या सदस्या दर सोमवारी भेटतात. त्या बैठकीत गायत्री मंत्र जप, ओंकार, प्राणायाम, प्रार्थना व पसायदान पठण होते. दर सोमवारी महिला आघाडी आध्यात्मावर चर्चा करतात. तसेच संतांची शिकवण, संगणक, स्मार्ट फोनचा वापर वगैरे विषयांवरही चर्चा, माहितीचे आदानप्रदान होते. सभासदांना बोलण्यास उद्युक्त केले जाते. संघटनेतर्फे श्रीरंग विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना मदत दिली जाते. मागच्या वर्षी घोडबंदर येथे वनवासी कल्याण आश्रम चालवणाऱ्या ज्योती जपे यांचा आणि माजी नगरसेविका महेश्वरी तरे यांचा त्यांच्या महिलाविषयक कामाबद्दल सत्कार करण्यात आला होता. महेश्वरी तरे यांनीही उपस्थित ज्येष्ठ महिलांना ब्लँकेट, शाल , श्रीफळ देऊन सन्मानित केले होते. या संस्थेचे एक सहकारी डॉ. माधवराव म्हस्के हे हास्ययोग कट्टा चालवतात. त्यांच्या कार्यातही सावली संघाचे सभासद सहभागी होतात. संस्थेच्या एक सदस्या 76 वर्षीय रमाबाई कामत यांनी मुंबई विद्यापीठातून संस्कृत या विषयातली पदवी मिळवलेली आहे. दर वर्षी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात संस्थेचा वर्धापनदिन साजरा केला जातो. वृध्दांच्या क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात. त्यातील विजेत्यांना वर्धापनदिनी पारितोषिके दिली जातात. वयाला 80 वर्षे आणि लग्नाला 50 वर्षे पूर्ण करणाऱ्या दांपत्यांचा सत्कार केला जातो. वर्षातून एकदा सभासदांची सहल नेण्यात येते. एकूण समवयस्क ज्येष्ठांनी एकत्र यावे, त्यांची करमणूक व्हावी आणि आजच्या विभक्त कुटुंबपध्दतीत त्यांच्या वाट्याला येणारा एकटेपणा कमी व्हावा म्हणून संघटना कार्य करते.

**अध्यक्षा – उल्का चव्हाण – 9987889590**

# ज्येष्ठच झाले निराधारांचे आधार



## लुईसवाडी ज्येष्ठ नागरिक संस्था

ठाणे पश्चिमेकडील हायवे शेजारच्या लुईसवाडी परिसरातील ज्येष्ठांची लुईसवाडी ज्येष्ठ नागरिक संघ ही संघटना आहे. तिची स्थापना डा सुभाष म्हसकर आणि श्रीराम बोरकर यांनी 2004 साली केली. सध्या मुकुंद कासार हे तिचे अध्यक्ष तर रघुनाथ वाणी हे उपाध्यक्ष आणि शुभांगी बावडेकर या सचिव आहेत. बावडेकर मॅडम मुंबई महापालिकेच्या डोंगरी येथील शाळेत 36 वर्षे अध्यापन करून मुख्याध्यापिका म्हणून निवृत्त झालेल्या आहेत. सध्या या संस्थेचे 100 सभासद आहेत. त्यातील 70 टक्के सदस्या महिला आहेत. संस्थेला स्वत:ची जागा नाही. संस्थापकांच्या घरीच महिन्यातून दोनदा सभासदांच्या बैठका होतात. पूर्वी अप्पा साळुंखे, काळे यांच्या घरी बैठका होत. आता सचिव शुभांगी बावडेकरांच्या निवासस्थानी बैठका होतात. सभासदांचे वैचारिक, बौध्दिक, सांस्कृतिक प्रबोधन व्हावे या दृष्टीने चर्चा कार्यक्रम आखले जातात. सामाजिक बांधिलकी जपण्यावर संघटनेचा भर आहे. सभासदांकडून देणग्या मिळवून त्यातून अनाथाश्रम, महिलाश्रम, वृध्दाश्रम, आदिवासी पाडे येथील गरजुंना, नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत केली जाते. संघटनेचे पदाधिकारी गरजू संस्थेला प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या गरजा समजून घेतात. त्यानुसार त्यांना मदत केली जाते. उम्मीद ही पारसिक, कळवा येथील संस्था फिनाईल बनवते. संस्थेचे सभासद त्यांच्याकडूनच फिनाईल घेतात. सिग्नल शाळेतील मुलांना विशेष मदत केली जाते. गतवर्षी चिपळूण येथील पूरग्रस्तांना मदत देण्यात आली होती. भिवंडीजवळ स्मीत या संस्थेतर्फे एक वृध्दाश्रम चालवला जातो. घरत मॅडम या त्याच्या प्रमुख आहेत. तिथे मुलांनी त्याग केलेले वृध्द पालक राहतात. त्यांच्या गरजा जाणून घेऊन लुईसवाडी ज्येष्ठ नागरिक संघातर्फे तेथील वृध्दांना डायपर, हार्पिक वगैरे वस्तू पुरवल्या गेल्या. दिवाळीत संस्थेच्या सदस्या मोठ्या हौसेने उटणे, आकाशकंदिल, फराळ, पणत्या, रांगोळी बनवतात. त्यांचे आदिवासी पाड्यांवर वाटप केले जाते. फेरीवाल्यांनाही भेटवस्तू दिल्या जातात. त्याचबरोबर फेरीवाल्यांना प्लास्टीकचा वापर टाळा, प्रदूषणाला घाला आळा, असा संदेश असलेले स्टीकर दिले जाते. सामाजिक बांधिलकी बरोबरच भारतीय संस्कृती जोपासण्यासाठीही संस्था विशेष प्रयत्न करते. दरवर्षी गणेशोत्सवात संघटनेच्या महिला सदस्या गणेशोत्सवात अथर्वशीर्ष आणि नवरात्रात श्रीसुक्ताचे जाहीर पठण करतात. संघटनेत आजवर वैशाली कुलकर्णी, अशोक पाटील आदी मान्यवरांची व अनेक नामवंत लेखक, विचारवंतांची व्याख्याने झाली आहेत. दरवर्षी महिला आणि इतर सभासदांची सहलही नेली जाते. काही सहली फक्त महिला सदस्यांच्या असतात. पर्यावरण दिन मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. विशेष म्हणजे संस्थेचे काही सदस्य स्वयंस्फुर्तीने हुजुरी येथील महापालिकेच्या शाळेत जाऊन तेथील विद्यार्थ्यांना काही विषय शिकवतात. तसेच त्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या निबंध, चित्रकला वगैरे स्पर्धा घेतल्या जातात. दरवर्षी एप्रिल महिन्यात संघटनेचा वर्धापन दिन असतो. तो मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. त्यात शालेय स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिके दिली जातात. एकूण सामाजिक बांधिलकी जोपासण्यावर आणि हिंदू संस्कृती जतन-संवर्धन करण्यावर लुईसवाडी ज्येष्ठ नागरिक संघाचा मुख्य भर आहे.

**सचिव – शुभांगी बावडेकर**
**– 9867867731**

# मन मोकळे करणारा कट्टा

विकास कॉम्प्लेक्स ज्येष्ठ नागरिक संघ



विकास कॉम्प्लेक्स हे ठाण्यातील एक गृहसंकुल आहे. या ठिकाणी ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना 2006 साली झाली. पूर्वी या संघाचे 49 सभासद होते. आता काळाच्या ओघात काही सदस्य परदेशात – परगावी राहायला गेल्यामुळे आणि काही अतीवृध्द झाल्याने या संघाची सदस्यसंख्या घटली आहे. सध्या 78 वर्षीय सुरेखा बढे या संघाच्या सचिव आहेत. त्या स्वयंस्फुर्तीने सदस्यांना चांगली नाटके, चित्रपट बघायला तसेच जेवणासाठी बाहेर घेऊन जातात. संघाच्या एक सदस्या शालिनी इनामदार या 86 वर्षांच्या आहेत. त्या संघाच्या उत्साही सदस्या आहेत. सर्व कार्यात सक्रीय असतात. या वयातही त्या सुईत दोरा ओवून शिवणकाम वगैरे करतात. तसेच त्या वाचनाची आवड जोपासतात. चांगली पुस्तके व वृत्तपत्रे नियमितपणे वाचतात. शुभदा रेडे या अन्य सदस्याही सर्व कार्यक्रमात उत्साही असतात. विकास कॉम्प्लेक्स मधे एक कट्टा आहे. त्यावर सर्व सदस्य संध्याकाळी 7 ते 8 या वेळात दररोज भेटतात. या वेळेत सर्व सदस्य गप्पा मारतात.. विचारांचे आदानप्रदान करतात. मन मोकळे करतात. पूर्वी या संघातर्फे ज्योती जिराफे यांचे योगा क्लासेस चालवले जात असत. तसेच दरवर्षी सहल काढली जात असे. कोरोनामुळे त्या उपक्रमात सध्या खंड पडला आहे. तरी संघात कोजागिरी दसरा, पौर्णिमा, संक्रांत, हळदी कुंकू वगैरे सण साजरे केले जातात. नवरात्रात महिला सदस्या विविधरंगी साड्या नेसून आपण मनाने हौशी चिरतरूण असल्याचे सिध्द करतात.

**कार्यवाह – सुरेखा बढे – 98704 27602**

# रश्मी सोसायटी, वृद्धांची सोबती

रश्मी ज्येष्ठ नागरिक संघ




ठाणे पश्चिमेच्या मनोरुग्ण हॉस्पिटल लजवळ रश्मी सोसायटी आहे. येथील ज्येष्ठ नागरिकांची रश्मी ज्येष्ठ नागरिक संघ ही संघटना आहे. सुप्रसिध्द कवी अरुण म्हात्रे हे या संघाचे सभासद आहेत. या संघाची स्थापना 25 फेब्रुवारी 2004 रोजी झाली. संस्थापक अध्यक्ष कै. रमेश पिंपळीकर होते. त्यांच्या बरोबर श्री. सूर्यकांत कद्दू व श्री. भालचंद्र बापट यांचाही या संघाच्या स्थापनेत पुढाकार होता. सध्या सुनीती महाशूर या संघाच्या अध्यक्षा, विनोद चौधरी हे सचिव आणि मिलिंद देशपांडे हे कोषाध्यक्ष आहेत. सध्या संघाचे 200 सदस्य आहेत. त्यापैकी साधारणत: 50 टक्के महिला सदस्या आहेत. दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कार्यकारिणीची बैठक होते. जुन्या ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या आणि सध्याच्या आनंद विश्व गुरूकुलाच्या आवारातील एक खोली या संघाला नगरसेवक शैलेश सावंत यांच्या प्रयत्नाने मिळाली आहे. त्यात कार्यकारिणीची बैठक होते तर परिसरातील दादा कोंडके एम्पी थिएटरमधे इतर कार्यक्रम होतात. रोज संध्याकाळी 6 ते 9 या वेळेत संघाचे कार्यालय उघडे असते. तिथे कॅरम खेळण्याची सुविधा आहे. काही सदस्य त्याचा लाभ घेतात. दर महिन्याला सर्वसाधारण सदस्यांसाठी एक करमणुकीचा कार्यक्रम होतो. त्यात कधी कथाकथन, गाणी तर कधी नामवंत वक्त्यांची व्याख्याने होतात. कवयित्री शांता शेळके यांच्या पुण्यतिथीनिमित्त एक सुंदर कार्यक्रम झाला होता. मा. अशोक चिटणीस, स्मीता मराठे अशोक हल्याळ इत्यादींची व्याख्याने आजवर झाली आहेत. कवीवर्य अरूण म्हात्रे यांचा पावसाळ्यावरील कवितांचा कार्यक्रमही एकदा झाला होता. आषाढी एकादशीनिमित् संघाच्या महिला सदस्यांनी संतांची मांदियाळी नावाचा सुंदर कार्यक्रम सादर केला होता. पुल जयंतीही साजरी केली जाते. संघातर्फे दिवाळी पहाट, त्रिपुरारी पौर्णिमा, आषाढी एकादशी साजरी केली जाते. त्यानिमित्त दिंडी काढली जाते. मासिक कार्यक्रमांतच सदस्यांचे वाढदिवस, पंचाहत्तरी पार करणाऱ्यांचे सत्कार केले जातात. संघटनेचे दोन सदस्य सूर्यकांत कद्दू व प्रकाश चितळे यांचा ठाणे महापालिका व ज्येष्ठ नागरिक संघ मध्यवर्ती समितीतर्फे 2016 साली ज्येष्ठ रत्न पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला होता. कोरोनापूर्व काळात दरवर्षी संघाच्या सहली जात असत. कर्जत येथील सद्गुरू वामनराव पै यांचे ध्यानकेंद्र, संघाचेच सदस्य असलेल्या जोगळेकर दांपत्याचे वाशिंद येथील सृष्टी फार्म हाऊस, वसई जवळचे मांडवी हिल रिसार्ट त्यादी ठिकाणी संघाच्या सहली झालेल्या आहेत. संघातर्फे काही सामाजिक संस्थांना मदत केली जाते. संघाशेजारीच जागृती पालक संस्था या संस्थेचे कार्यालय आहे. संस्थेची आवारभिंत संघटनेने या संस्थेतील मतीमंद विद्यार्थ्यांकडून रंगवून घेतली आहे. विशेष म्हणजे रश्मी ज्येष्ठ नागरिक संघातर्फे दरवर्षी स्पंदन नावाची एक स्मरणिका काढली जाते. त्यात संस्थेतील सदस्यांच्या लेखनाला प्रसिध्दी दिली जाते.

**कोषाध्यक्ष – मिलिंद देशपांडे**
**– 99305 05478**




OUR BRANCHES: GHODBUNDER ROAD | MAKHAMALI TALAO | MULUND | SEAWOODS | VASHI

ROBOTIC CATARACT TREATMENT

Call: 82917 14838/ 75060 66769
www.shreeramkrishnanetralaya.com

Shree Ramkrishna Netralaya
Super Speciality Eye Care

संकल्पना - निखिल बल्लाळ पुरवणी संकलन - प्रशांत असलेकर आणि सुरेश सोंडकर, लेआऊट - महेंद्र माने